# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या—५०**

### जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी नवीन यंत्रणा राबविण्याबाबत

(१) **३१३५** (१०-४-२०१५). **श्री. आनंदराव पाटील, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अनंत गाडगीळ, डॉ. सुधीर तांबे, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नोकरभरती, शिक्षणप्रवेश अशा विविध ठिकाणी उपयुक्त ठरणा-या जात पडताळणीसाठी वेळ, पैसा खर्च करावा लागतो. ज्यांच्या वडीलांकडे जातपडताळणी प्रमाणपत्र असेल, त्यांच्या अपत्यांना नव्याने पडताळणी करण्याची आवश्यकता राहणार नाही. त्याचबरोबर खोट्या पडताळणी प्रमाणपत्रांना आळा घालण्याच्या दृष्टीने रॅन्डम चेकिंग सुद्धा होईल अशी यंत्रणा राबविण्याची गरज असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्य शासनाने याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरविले आहे काय;

(३) असल्यास, त्याचा तपशील काय;

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय?

**श्री. राजकुमार बडोले** (३-९-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक जात पडताळणी प्रकरण स्वतंत्रपणे त्याच्या गुणवत्तेनुसार तपासण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देश तसेच सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ नुसार महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ विहित करण्यात आले आहेत. या नियमांनुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामधील उमेदवारांचे शैक्षणिक, सेवा विषयक व निवडणूक याबाबींकरिता जात प्रमाणपत्र देणे व जात पडताळणीचे कामकाज चालते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यात जलसंपदा विभागाचे दोनशेहून अधिक ( प्रगतीपथावरील व अपुर्ण ) प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय (मान्यतेवाचून रखडल्याबाबत) मान्यता देण्याबाबत

(२) **३४७२** (८-४-२०१५). **श्री. जयवंतराव जाधव, श्री. अनिल भोसले, श्री. ख्वाजा बेग** : सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात जलसंपदा विभागाचे दोनशेहून अधिक प्रगतीपथावरील व अपुर्ण प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेवाचून रखडल्यामुळे या कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शासनाने लवकरात लवकर सुधारित प्रशासकीय मान्यता देवून ही कामे पूर्ण करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधीनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याकरीता शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन** (३०-७-२०१५) : (१) नोव्हेंबर, २०१४ मध्ये २७१ प्रकल्पांचे सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत.

(२) होय.

(३) सन फेब्रुवारी, २०१५ मध्ये २२ प्रकल्पांना सुप्रमा व ९ एप्रिल, २०१५ च्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीमध्ये २८ लघु प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी उपलब्ध सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील अनुदान खर्च करण्यास काही प्रकल्पांना परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना देण्यात येणारी वेतनश्रेणी ही आश्रमशाळेतील शिक्षकांनाही लागू करण्याबाबत

(३) **३७५८** (१०-४-२०१५). **श्री. विक्रम काळे, श्री. हेमंत टकले, श्री. अनिल भोसले, डॉ. सुधीर तांबे, श्री. ख्वाजा बेग, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. सतिश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील जिल्हापरिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित समजून नियुक्त दिनांकापासून त्यांना पदवीधर प्रशिक्षत शिक्षकांची वेतनश्रेणी (बी. एड) देण्यात यावी, या शालेय शिक्षण विभागाच्या ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार आश्रमशाळेतील शिक्षकांनाही हे लाभ देण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत काय;

(२) असल्यास, त्यासाठी वित्तीय तरतूद करण्यात आली आहे काय ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (३-९-२०१५) : (१) व (२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**स्थानिक शेतक-यांच्या सोयीसाठी अकोला जिल्ह्यात पाटबंधारे विभागाचे कार्यालय सुरु करण्याबाबत**

(४) **३८९७** (८-४-२०१५). **श्री. ख्वाजा बेग, श्री. आनंद ठाकूर, श्री. अनिल भोसले, श्री. हेमंत टकले** : सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) अकोला जिल्ह्यात पाटबंधारे विभागाचे अनेक प्रकल्प सुरु आहेत परंतू या प्रकल्पाचे कार्यालय दुस-या जिल्ह्यात असल्याने प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील शेतक-यांना शेती खरेदी-विक्री करताना संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याकरीता दुस-या जिल्ह्यात जावे लागते, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यामुळे शेतक-यांचा वेळ, श्रम व पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक शेतक-यांनी शासनाकडे जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यालय असावे म्हणून गेली दोन वर्षापासून सतत मागणी करीत आहेत, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन** (२८-७-२०१५) : (१) व (२) नाही. अकोला जिल्ह्यातील ३५ बांधकामाधीन प्रकल्पांपैकी घुंगशी व काटेपूर्णा बॅरेज या दोन मध्यम प्रकल्पांचे काम हाताळणारी विभागीय कार्यालये अनुक्रमे अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात आहेत. तथापि, घुंगशी प्रकल्पाचे उपविभाग कार्यालय मूर्तिजापूर तालुक्यात व काटेपूर्णा बॅरेजचे शाखा कार्यालय प्रकल्पस्थळी आहे. ना-हरकत प्रमाणपत्राबाबतचे अर्ज क्षेत्रीय कार्यालयात दिलेनंतर त्वरीत कार्यवाही केली जाते.

(३) होय.

(४) घुंगशी प्रकल्पाचे उपविभागीय कार्यालय मुर्तिजापूर येथे कार्यरत आहे व काटेपूर्णा बॅरेजचे काम करणारे उपविभाग कार्यालय खामगाव येथून अकोला येथे स्थानांतरीत करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**राज्यातील विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना विविध सुविधा पुरविण्याबाबत**

(५) **४२५३** (२०-४-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ. सुधीर तांबे, श्री. रामहरी रूपनवर, प्रा. जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील विनाअनुदानित शाळातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप, मध्यान्ह भोजन, पोषण आहार दिला जात नसून तसेच शिष्यवृत्ती परिक्षेस बसण्यासाठी परवानगी देण्याबाबत अशा विविध समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्यातील विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके, मध्यान्ह भोजन व पोषण आहार तसेच शिष्यवृत्ती परिक्षेस बसण्यासाठी परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**मा. विनोद तावडे** (२९-७-२०१५) : (१) व (२) शालेय पोषण आहार योजना, सर्व शिक्षा अभियानातंर्गत मोफत पाठ्यपुस्तके वाटप योजना या योजना केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येतात. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा या मधील इयत्ता १ ली ते ८ वी चे विद्यार्थी या योजनांचे लाभार्थी आहेत.

सर्व शासनमान्य (शासकीय/खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित) शाळांमधील विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती देय आहे. आय.सी. एस. सी व सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती परिक्षा देता येते. तथापि, त्यांना शिष्यवृत्ती देय नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांना वृध्दापकाळात निवृत्तीवेतन देण्यासाठी धोरण आखण्याबाबत**

(६) **४४८९** (८-४-२०१५). **डॉ. सुधीर तांबे, श्री. संजय दत्त, श्री. विक्रम काळे, श्री सतिश चव्हाण** : सन्माननीय कृषि मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील प्रगतीत मोठा वाटा उचलणा-या शेतक-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, आयुष्यभर कष्ट करणा-या शेतक-यांना वृध्दापकाळात निवृत्तीवेतन देण्यासाठी शासनाचे कोणते धोरण आखलेले आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१३-८-२०१५) : (१) व (२) शेतक-यांना निवृत्तीवेतन देण्यासंदर्भात शासनाचे कोणतेही धोरण नाही.

शेतक-यांना येणा-या अडचणींचा विचार करून राज्यात शेती व्यवसाय करतांना होणारे विविध अपघात तसेच वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, वाहन अपघात या कोणत्याही अपघातांमुळे शेतक-यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त शेतक-यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक लाभ देण्याकरीता सन २००५-०६ पासून शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजना राबविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे शेतक-यांच्या पिकांचे, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर या सारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच किड व रोगांच्या मोठ्या प्रमाणावर होणा-या प्रादुर्भावामुळे होणा-या नुकसानीसंदर्भात निकषानुसार योजनेत सहभागी होणा-या शेतक-यांना विम्याच्या माध्यमातून नुकसान भरपाई देण्यात येते. त्याकरीता राज्यामध्ये रब्बी हंगाम १९९९-२००० पासून राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

### रायगड जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील शेतक-यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

(७) **४६६४** (१०-४-२०१५). **श्री. सुनिल तटकरे** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) रायगड जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील टॉपवर्थ कंपनीने आदिवासी शेतक-यांच्या जमिनी संपादित करतांना शासनाची परवानगी घेतली आहे काय ;

(२) असल्यास, किती शेतक-यांना जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे वा देण्यात येत आहे ;

(३) अद्यापही जमिनीचा मोबदला दिला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ;

(४) जमिनीचा मोबदला त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२१-९-२०१५) : (१) मौजे हेदवली, ता. सुधागड-पाली येथील ग. नं. २०५, २०६ व २१२ या आदिवासी खातेदारांच्या मिळकती खरेदी करण्यासाठी कंपनी व आदिवासी खातेदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ अ अन्वये खरेदी-विक्री परवानगी मिळणेकामी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे अर्ज दाखल केले आहेत. परंतू, सदर प्रस्तावामध्ये परवानगीसाठी आवश्यक कागदपत्राची पुर्तता झालेली नसल्यामुळे सदरची प्रकरणे पुर्ततेसाठी प्रलंबित आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यात बेसुमारपणे डोंगर पोखरले जात असल्याबाबत

(८) **४८१०** (९-४-२०१५). **श्री जयवंतराव जाधव, श्री. नरेंद्र पाटील, श्री. हेमंत टकले, श्री. अनिल भोसले, श्री. किरण पावसकर** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नाशिकसह जिल्ह्यातील डोंगर बेसुमारपणे पोखरले जात असल्यामुळे शासनाला दरवर्षी २०० कोंटीच्या स्वामीत्वधनावर पाणी सोडावे लागत असल्याची गंभीर घटना उघडकीस आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१-९-२०१५) : (१), (२) व (३) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही. मात्र नाशिक जिल्ह्यात एकूण ४४ खाणपट्ट्यांना रितसर मंजूरी देण्यात आली असून त्यांचेकडून स्वामीत्वधनाची रक्कम वसूल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**एसटी बस आगाराच्या काही वाहकांकडून प्रवाश्यांकडे सुट्टे पैसे नसल्याचे कारण दाखवून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याबाबत**

(९) **५०७६** (१०-४-२०१५). **श्री. अनिल भोसले, श्री. जयवंतराव जाधव, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. ख्वाजा बेग** : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्रींगोंदा एसटी बस आगाराच्या काही वाहकांकडून प्रवाश्यांकडे सुट्टे पैसे नसल्याचे कारण दाखवून मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रवाश्यांची आर्थिक लूट करणा-या वाहकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते** (२९-८-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) श्रीगोंदा आगारातील वाहकाने रु. ३० परत न दिल्याबाबत एका प्रवाशाने दि. १४-१०-२०१४ रोजी शिरुर बसस्थानकावर तक्रार नोंदविली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. २७-०४-२०१५ रोजी श्रीगोंदा आगारात सदर प्रकरणी समक्ष सुनावणी आयोजित केली होती. तक्रारकर्ते व संबंधीत वाहक यांनी सदर प्रकरण समेटाने मिटवल्याने संबंधीत वाहकाने तक्रारकर्त्यास रु. ३० परत केले व तक्रारकर्ते यांनी त्यांची तक्रार मागे घेत असल्याचे लेखी निवेदन दिले.

संबंधीत वाहकास प्रवासी तक्रारीस जबाबदार धरुर त्यांचेवर राज्य परिवहन महामंडळाच्या " शिस्त व आवेदन कार्यपध्दती " नुसार सक्त ताकीद देण्यात आली असून भविष्यात कुठल्याही प्रकारची प्रवासी तक्रार उद्‌भवणार नाही, अशी समज देण्यात आली आहे.

प्रवाशांचे राहीलेले पैसे त्वरीत परत करणे हे वाहकांचे कर्तव्य असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास खातेनिहाय कारवाई करावी, अशा परिपत्रकीय सूचना विभागीय पातळीवर प्रसारित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथे पंचतारांकित औद्योगिक वसाहत स्थापन करणेबाबत**

(१०) **५३३५** (१७-४-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नाशिक महानगराचे औद्योगिक, व्यावसायिक व आर्थिक महत्व विचारात घेता नाशिक येथे पंचतारांकित औद्योगिक वसाहत स्थापन करणेबाबत स्थानिक उद्योगविश्वाकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, प्रश्नोक्त मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे ;

(३) मुंबई, पुणे नंतर सुवर्ण त्रिकोणातील शहर म्हणून नाशिकचे वाढलेले महत्व आणि ठिकठिकाणच्या उद्योगांची नाशिक येथे असलेली पसंती ह्या बाबी विचारात घेता नाशिक येथे सर्वसोयी सुविधा संपन्न पंचतारांकित औद्योगिक वसाहत स्थापन करणेसंदर्भात शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई** (२१-८-२०१५) : (१) हे खरे नाही. तथापि, नाशिक महानगरपालिका हद्दीलगत अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र स्थापन करावे याबाबत स्थानिक उद्योजकांनी मागणी केली आहे.

(२) व (३) पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत उद्योजकांची मागणी नसल्याने सदरचा प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. तथापि, नाशिक औद्योगिक क्षेत्रासाठी अति. दिंडोरी, मालेगाव व येवला येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आले असून तेथील भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात असून आतापर्यंत ४८१.५२ हे. आर क्षेत्राचा ताबा महामंडळास प्राप्त झाला आहे व त्या ठिकाणी प्राथमिक स्वरुपाचे रस्ते, सिमांकन, कंटुरसर्व्हे इ. पायाभूत सुविधाची कामे सुरु आहेत.

---

**व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश देण्याबाबत**

(११) **५५१०** (२३-५-२०१५). **ॲड. निरंजन डावखरे** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील मागासवर्गीयांमधील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी ३८१ शासकीय वसतिगृहे बांधण्यात आली आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर वसतिगृहातील प्रवेशाचे निकष वा धोरण पाहता त्यामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) अभियांत्रिकी वा तत्सम व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदरच्या वसतिगृहात प्रवेश देण्यात येत नाहीत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदर प्रवेश धोरणात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव विशेष समाज कल्याण आयुक्त, पुणे यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला असून त्याबाबत अद्यापही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, सदर प्रकरणी अद्याप कार्यवाही न होण्याची कारणे काय व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले** (३०-७-२०१५) : (१) होय.

(२) नाही. अभियांत्रिकी तसेच इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्येक शासकीय वसतिगृहामध्ये निश्चित करून दिलेल्या कोट्यानुसारच प्रवेश देण्यात येतो.

(३) होय. आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दिनांक १३-०८-२०१४ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन शासकीय मागासवर्गीय वसतिगृह प्रवेशाबाबतच्या प्रचलित धोरणात दिनांक १८ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मुंबईत वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नसेल तर वाहनांची नोंदणी करण्यात येऊ नये असे उच्च न्यायालयाने दिलेले आदेश**

(१२) **५५२८** (१६-४-२०१५). **श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. दिपकराव साळूंखे-पाटील, श्री. नरेंद्र पाटील** : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) मुंबईत वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी वाहन मालकांकडून जोपर्यंत कागदपत्रे दाखविण्यात येत नाहीत तोपर्यंत त्यांच्या वाहनाची नोंदणी केली जाणार नाही अशा अटींचा समावेश असलेली योजना आखण्याची सूचना मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी शासनाला दिली आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने योजना आखली आहे काय ;

(३) असल्यास, ही योजना केव्हापासून अंमलात येणार आहे ?

**श्री. दिवाकर रावते** (२८-८-२०१५) : (१) मुंबईमध्ये वाढत्या वाहनसंख्येमुळे होणा-या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी जनहित मंच, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ६२/२०१४ वर दिनांक ११-०२-२०१५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालयाने पार्किंगच्या समस्येबाबत मल्टीलेवल/अंडरग्राऊंड पार्किंग उपलब्ध करणे, वाहनांची खरेदी/नोंदणी करण्यासाठी पार्किंगच्या जागेचा पुरावा मागणे, चुकीच्या ठिकाणी/सार्वजनिक ठिकाणी वाहने उभी करण्याबद्दलच्या दंडात वाढ करणे या बाबींवर उपाययोजना करण्याची सूचना शासनास दिली आहे.

(२) व (३) सदरच्या उपाययोजना शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

**ई-शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरता न आल्यामुळे हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत**

(१३) **५५८७** (२१-४-२०१५). **श्री. धनंजय मुंडे, श्री. सुनिल तटकरे, श्री. अमरसिंह पंडित** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या ई-शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरता न आल्यामुळे हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, ई-शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरताना संकेतस्थळातील त्रुटीमुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेले आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वाढवून देखील संकेत स्थळातील त्रुटी कमी केल्या नाहीत, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, संकेतस्थळांच्या निर्मितीमध्ये विभागामार्फत दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाल्याचे उघड झाले आहे, हेही खरे आहे काय ;

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले** (२४-८-२०१५) : (१) नाही. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजने अंतर्गत मार्च, २०१५ अखेर १६,५८,२८० इतके ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यातील मागासवर्गीय गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळत नसल्याबाबत

(१४) **५५९१** (२१-४-२०१५). **श्री. धनंजय मुंडे, श्री. सुनिल तटकरे, श्री. प्रकाश गजभिये** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील मागासवर्गीय गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना शासकीय वसतिगृहात प्रवेश दिला जातो, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, मागासवर्गीयांमधील अभियांत्रिकी पदविका व पदवीच्या दुस-या वर्षात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळत नसल्याची बाब जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळत नसल्याने त्यांचे हाल होत आहेत, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, समाज कल्याण आयुक्तांनी प्रवेश धोरणात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीस्तव सादर केला आहे, हे खरे आहे काय ;

(५) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करून प्रवेश धोरणात बदल करणे, द्वितीय वर्षातील पदविका, आयटीआय व पदवीच्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले** (३०-७-२०१५) : (१) होय.

(२) व (३) नाही. अभियांत्रिकी तसेच इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्येक शासकीय वसतिगृहामध्ये निश्चित करून दिलेल्या कोट्यानुसारच प्रवेश देण्यात येतो.

(४) होय.

(५) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दिनांक १३-०८-२०१४ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार डिप्लोमा पूर्ण होऊन अभियांत्रिकीच्या दुस-या वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना व आयटीआय पूर्ण होऊन पॉलिटेक्निकला प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाबाबतच्या प्रचलित धोरणात दिनांक १८ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेला आहे.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाज बांधवाना वैधता प्रमाणपत्र देण्यास विभागाकडून विलंब होत असल्याबाबत

(१५) **५७५५** (२३-४-२०१५). **श्री. जनार्दन चांदूरकर, श्री. संजय दत्त, श्री. रामहरी रुपनवर, डॉ. सुधीर तांबे** : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाज बांधवांना वैधता प्रमाणपत्र देण्यास संबंधित विभागाकडून विलंब होत असल्याने सिंधुदुर्ग जिल्हा ठाकर समाज संघटनेने ठाणे येथील वर्तकनगर येथील अनुसूचित जाती विभागाच्या कार्यालयासमोर साखळी उपोषण माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केले होते, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ठाकर समाज केवळ शासनाने जात वैधता प्रमाणपत्र नसल्याने शिक्षण, नोकरी आणि इतर आवश्यक बाबींपासून वंचित आहेत, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, ठाकर या आदिवासी समाजास जात वैधता प्रमाणपत्र देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णू सवरा** (११-९-२०१५) : (१) होय. दिनांक १२-०१-२०१५ व दिनांक १३-०१-२०१५ रोजी ठाणे येथील समिती कार्यालयासमोर सिंधुदुर्ग जिल्हा ठाकर समाज संघटनेने उपोषण केले होते.

(२), (३) व (४) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र " तपासणी समितीचे कामकाज " महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र. २३) व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पारीत केलेले " महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ " मधील तरतुदीनुसार करण्यात येते, या नियमात नमूद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणा-या व्यक्तीस/अर्जदारास अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळते.

---

### राज्यातील जुन्या २२ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयाबाबत

(१६) **५८३३** (९-४-२०१५). **श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. नरेंद्र पाटील, श्री. प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील जुन्या २२ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, हे प्रकल्प कोणकोणत्या वर्षातले आहेत ;

(३) असल्यास, या सुधारित प्रकल्पांच्या किंमतीत २२५ कोटीची वाढ झाली आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन** (२८-७-२०१५) : (१) होय. अंशतः खरे. फेब्रुवारी २०१५ मध्ये २२ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता सन १९८५ ते सन २००९ या दरम्यान देण्यात आली आहे.

(३) होय. अंशतः खरे. सदर प्रकल्पांच्या एकूण किंमतीत २७७ कोटींची वाढ झाली आहे.

---

### केंद्र शासनाच्या मदतीची वाट न बघता शेतक-यांना तात्काळ मदत करण्याबाबत

(१७) **६२४०** (१६-४-२०१५). **श्री. राजेंद्र मुळक, श्री. संजय दत्त, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद** : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर होत असून राज्य शासनाने शेतक-यांच्या मदतीसाठी ४ हजार कोटीचे वितरण केले अजून ३९०० कोटी केंद्राने तातडीने मदत वर्ग करावी अशी मागणी केंद्रीय कृषी सचिवांकडे मा. मुख्यमंत्री महोदयांनी केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्यातील दुष्काळ परिस्थिती निपटण्यासाठी केंद्र शासनाकडून एकूण किती निधींची मदत देण्यात आली आहे त्याचा तपशील काय आहे ;

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून देण्यात आलेल्या दुष्काळ निधीच्या वाटपापैकी एकूण किती शेतक-यांना मदत देण्यात आली ;

(४) असल्यास, केंद्र शासनाकडून दुष्काळ निधी मदत देण्याबाबत विलंब होत असल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (३०-७-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) केंद्र सरकारकडे ज्ञापन पाठविण्यात आले होते. त्याअनुषंगाने केंद्र शासनाकडून राज्याला रु. १९६२.९९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला.

(३) आतापर्यंत ६०५१००७ इतक्या शेतक-यांना निधी वाटप करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने अतिरिक्त जिल्हाधिका-याच्या अध्यक्षतेखाली जात पडताळणी समिती नियुक्ती करण्याच्या निर्णयाबाबत**

(१८) **६३५७** (२१-४-२०१५). **डॉ. नीलम गो-हे** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) शासनाने जात पडताळणी प्रमाणपत्रांसाठी प्रत्येक जिल्ह्यांसाठी अतिरिक्त जिल्हाधिका-याच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला परंतु त्याबाबत अद्यापही अध्यादेश काढला नाही, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, यामुळे राज्यातील विविध जात पडताळणी समित्यांकडे विद्यार्थी व कर्मचा-यांचे तब्बल एक लाख अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, शासनाने अध्यादेश अद्यापपर्यंत न काढण्याची कारणे काय आहेत ;

(४) असल्यास, सदरचा अध्यादेश काढून प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (२७-७-२०१५) : (१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ०२-०३-२०१५ अन्वये घेण्यात आलेला आहे.

(२) मार्च, २०१५ अखेर एकूण १,०७,१६३ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत. परंतु जिल्हानिहाय समित्या कार्यान्वित झालेल्या नाही म्हणून सदर प्रकरणे प्रलंबित आहे असे नाही.

(३) दिनांक ३-२-२०१५ रोजी आदेश निर्गमित झालेला असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही चालू आहे.

**दारुबंदी प्रचार आणि प्रसाराकरीता कोणतेही कार्यक्रम राबविले जात नसल्याबाबत**

(१९) **६३६५** (१६-४-२०१५). **डॉ. निलम गो-हे** : सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) पुण्यातील दारुबंदी प्रचार आणि प्रसार कार्यालयात केवळ तीन जण असून पुरस्काराचे धनादेश देण्याशिवाय कोणतेच काम या कार्यालयाला नाही, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या विभागाकडून दारुबंदीच्या प्रचार आणि प्रसाराकरीता कोणतेही कार्यक्रम राबविले जात नाही, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, या विभागात आवश्यक तो कर्मचारी वर्ग व दारुबंदीकरिता योग्य ते कार्यक्रम राबविण्याकरिता शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ;

(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले** (२-९-२०१५) : (१) व (२) नाही.

(३) सदर योजना राबविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. आवश्यक तो कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देणे.

२. अंमली पदार्थ सेवन विरोधी मोहिम राबविणे.

३. व्यसनमुक्ती धोरण राबविणे

४. तंबाखू विरोधी कार्यक्रम आयोजित करणे

५. मादक पदार्थ सेवन विरोधी मोहिम राबविणे.

६. ग्रामीण व शहरी भागात व्यसनमुक्ती विषयावर विविध कार्यक्रमान्वये प्रचार व प्रसिद्धी करणे.

७. व्यसनमुक्ती उपचार व मार्गदर्शक केंद्रे स्थापन करणे.

८. व्यसनमुक्तीसाठी कार्य करणा-या संस्थांना पुरस्कार प्रदान करणे.

९. व्यसनमुक्ती लोकांवर उपचार व समुपदेशन केंद्रांना औषधोपचार आणि प्रसिद्धीसाठी अनुदान देणे.

१०. व्यसनमुक्तीसाठी पुर्णवेळ काम करणा-या संस्थेस अनुदान देणे

(४) राज्य व्यसनमुक्त करणे ही शासनाची मुख्य भूमिका आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी जनता दारुबंदीची मागणी करेल तेथे शासन दारुबंदीच्या बाजुने जनतेच्या मागे उभे राहील. दारुचा प्रसार नव्हे तर बेकायदा दारुचे संपूर्ण निर्मलून व वैध दारुचे प्रभावी नियंत्रण हे राज्याचे प्रमुख धोरण आहे.

---

**माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यात एमआयडीसी चालू करण्याबाबतचा एमआयडीसीचा अहवाल शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

(२०) **६५६६** (२१-४-२०१५). **श्री. रामहरी रुपनवर, प्रा. जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यात एमआयडीसीसाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न केल्यास नवे उद्योग वाढवून बेकारांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकत असल्याचे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एमआयडीसीचा अहवाल शासनाकडे प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, याबाबत शासनाने बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्याकरीता एमआयडीसीचे उद्योग वाढविण्याबाबत पुढे काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे ;

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** (४-९-२०१५) : (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने माळशिरस तालुका जिल्हा सोलापूर येथे अकलूज औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे वेळापूर व मौजे पिसेवाडी येथील ३०६.०४ हे. आर क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना दिनांक १७ जून १९९२ व दिनांक १ जानेवारी २००२ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि संबंधित शेतक-यांनी भूसंपादनास तीव्र विरोध दर्शविला आहे. तसेच मौजे वेळापूर येथील ३२.१६ हे. आर क्षेत्र शेतीविकास महामंडळाची असल्यामुळे खंडकरी शेतक-यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे व मा. सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे" ठेवणेचे आदेश दिलेले आहेत.

अकलुज औद्योगिक क्षेत्रातील अधिसुचित करण्यात आलेल्या क्षेत्राची प्राथमिक कार्यवाही सुरु असताना स्थानिक प्रतिनिधी यांनी सदर क्षेत्र रद्द करण्यासंबंधी दिनांक ९ नोव्हेंबर २०१३ रोजी निवेदन सादर केले आहे व ग्रामपंचायत पिंपरी, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर यांनी सदर क्षेत्रास विरोध दर्शवून ग्रामपंचायतीमध्ये तसा ठराव संमत केला आहे. त्यामुळे महामंडळाने अकलुज औद्योगिक क्षेत्रासाठी स्थानिक प्रतिनिधी यांचा तीव्र विरोध तसेच मौजे वेळापूर येथील ३२.१६ हे. आर. जमीन शेती महामंडळाची असल्याने खंडकरी शेतक-यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला दावा व सदर क्षेत्रासाठी कायमस्वरुपी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध होत नसल्यामुळे सदर क्षेत्रासाठी अधिसुचित करण्यात आले. क्षेत्र विनाअधिसुचित करण्याची बाब विचाराधीन आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्याच्या पशुधनात वाढ करणेबाबत**

(२१) **६८५६** (३१-७-२०१५). **श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. राहुल नार्वेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. हेमंत टकले, श्री. ख्वाजा बेग** : सन्माननीय पशुसंवर्धन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा पशुसंवर्धन या पूरक रोजगारांच्या माध्यमाचे प्रमाण राज्यात सर्वाधिक कमी होत आहे, हे खरे आहे काय ;

(२) मागील वीस वर्षाच्या कालावधीत राज्यातील पशुधनाचे प्रमाण सुमारे २३.२ टक्क्यांनी कमी झाले आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, शेती हा राज्याचा आर्थिक कणा असल्याने, राज्याच्या पशुधनात वाढ होण्यासाठी शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२९-८-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही. मागील वीस वर्षाच्या कालावधीत राज्यातील पशुधनाचे प्रमाणात १०.७३ टक्क्यांनी घट झाली आहे.

(३) राज्यात पशुधन वाढविण्यासाठी कृत्रिम रेतन कार्यक्रम, आनुवंषीक सुधारणा योजना, पशुखाद्य वाटप करणे वैरण विकास योजना तसेच दुधाळ जनावरे, शेळया मेंढया व कोंबडयांचे वाटप करणे अशा विविध योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उदभवत नाही.

**धर्माबाद (जि. नांदेड) येथील वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, लाईन हेल्पर यांनी गुन्हा दाखल न करण्याकरीता लाच घेतल्याबाबत.**

(२२) **७०८२** (३१-७-२०१५). **श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. संजय दत्त, श्री. राजेंद्र मुळक, श्री. सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. रामहरी रुपनवर, श्री. भाई जगताप** : मा. ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) धर्माबाद (जि. नांदेड) येथे चारचाकी वाहनाने विद्युत खांबाला धडक देऊन पाडल्याचा गुन्हा दाखल न करण्यासाठी १३ हजाराची लाच येथील वीज वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, लाईन हेल्पर यांनी घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (२३-९-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीने संबंधित कर्मचा-यांना निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**शेतातील पिकांचे खरीब व रब्बी वर्गीकरणामुळे नुकसान भरपाई मिळण्यास होत असलेला विलंब**

(२३) **७२७९** (३१-७-२०१५). **श्री. मितेश भांगडिया, श्री. अनिल सोले** : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात शेतक-यांच्या शेतातील पीकांचे खरीप व रब्बी अशा दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात येते, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्यात झालेल्या सिंचनामुळे बहुतेक सर्वच स्थानी कमी जास्त प्रमाणात खरीप पीके घेतली जातात, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, अतिवृष्टी वा अवर्षणामध्ये शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीची शासनामार्फत देण्यात येणारी नुकसान भरपाई रब्बीच्या गावांमध्ये फार उशीरा देण्यात येते, हेही खरे आहे काय ;

(४) असल्यास, खरीप व रब्बी अशी वर्गवारी बंद करण्याचे शासनाकडे प्रस्तावित आहे काय ;

(५) नसल्यास, वर्गवारी बंद न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१८-९-२०१५) : (१) होय.

(२) हे खरे नाही. राज्यातील पिकाखालील क्षेत्राशी तुलना करता, बागायत क्षेत्राचे प्रमाण १७.६८ टक्के इतकेच आहे. लागवडीखालील क्षेत्रापैकी १४३.५६ लाख हे. क्षेत्रावर खरीपाची, तर ६२.४३ लाख हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची लागवड करण्यात येते.

(३) नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी शेतक-यांना शासनाकडून नुकसान भरपाई दिली जात नसून आर्थिक मदत दिली जाते. रब्बीच्या गावांमध्ये सदर मदत उशीरा दिली जाते, हे म्हणणे खरे नाही.

(४) खरीप व रब्बी अशी वर्गवारी बंद करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) हवामानानुसार खरीप पिके व रब्बी पिके अशी वर्गवारी करण्यात आलेली असून ती बंद करण्याची आवश्यकता वाटत नाही.

---

### राज्यातील मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत

(२४) **७५१०** (३१-७-२०१५). **श्री. विक्रम काळे, श्री. अमरसिंह पंडित, श्री. सतिश चव्हाण, श्री. ख्वाजा बेग, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ. सुधीर तांबे, श्री. दत्तात्रय सावंत** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासन स्तरावर काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (९-९-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक १ जून २०१५ पासून शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये यासाठी स्वतंत्र वर्गवारी निर्माण करण्यात आली असुन महाराष्ट्र विद्युत नियामकआयोगाच्या मान्यतेने सदर वर्गवारीसाठी वेगळे दर निश्चित करण्यात आले असून सदरचे दर हे अन्य वर्गवारीसाठी विहित केलेल्या दरापेक्षा तुलनेने कमी ठेवण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील महानिर्मिती आणि महापारेषण या दोन कंपन्यांची मालमत्ता विकण्याच्या प्रस्तावाबाबत

(२५) **८२९५** (३१-७-२०१५). **श्री. महादेव जानकर** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील महानिर्मिती आणि महापारेषण ह्या दोन कंपन्यांनी मालमत्ता विकण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, राज्य शासनाने यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (२३-९-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नच उद्‌भवत नाही.

## सोलापूर व नांदेड जिल्ह्यातील बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

(२६) **८४०७** (२९-७-२०१५). **श्री. माणिकराव ठाकरे, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. शरद रणपिसे, श्री. अनिल तटकरे, श्री. नरेंद्र पाटील, श्री. अमरसिंह पंडित, श्री. जगन्नाथ शिंदे, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. किरण पावसकर, श्री. ख्वाजा बेग, श्री. अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. हेमंत टकले, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.—

(१) सोलापूर व नांदेड येथील बेरोजगारांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी सोलापूर येथील जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ९८ प्रस्ताव संबंधित बँकांकडे पाठविण्यात आले असून त्यापैकी फक्त ४५ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली तसेच नांदेड जिल्हा उद्योग केंद्राकडून कर्ज मंजूर होऊनही संबंधित बँकेमार्फत कर्ज वाटप होत नाही, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सोलापूर मधील उर्वरित ५३ कर्ज प्रस्तावांना मंजुरी न देण्याची तसेच नांदेड जिल्ह्यातील मंजूर कर्जाचे वाटप न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** (१-९-२०१५) : (१) हे खरे नाही.

१. सोलापूर जिल्ह्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित निधीपैकी सुधारित बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्ज वितरणाचे प्रमाण १००% इतके आहे व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेत कर्ज वितरणाचे प्रमाण १००% आहे.

२. नांदेड जिल्ह्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पित निधीपैकी सुधारित बीज भांडवल योजनेअंतर्गत कर्ज वितरणाचे प्रमाण ९५.५०% व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वितरणाचे प्रमाण ९९.६०% इतके आहे.

(२) व (३) बँकेकडून कर्ज प्रकरणे मंजूर न होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :—

१. अर्जदार कागदपत्रांची पूर्तता न करणे.

२. बँकेच्या कार्यक्षेत्रात येत नसणे.

३. सदर व्यवसायात वाव नसणे.

४. अर्जदार कर्ज घेणेस इच्छूक नसणे.

५. अनुभवाची कमतरता/पूर्वानुभव समाधानकारक नसणे.

६. व्यवसाय तांत्रिक व आर्थिकदृष्टया किफायतशीर नसणे.

७. जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी बीज भांडवलाची रक्कम अदा केलेल्या सर्व प्रकरणात बँकेने कर्ज वाटप केलेले आहे.

## राज्यात कृषि मूल्य आयोगाची स्थापना करण्याबाबत

(२७) **८४५५** (३१-७-२०१५). **श्री. माणिकराव ठाकरे, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. शरद रणपिसे** : सन्माननीय कृषि मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात कृषि मूल्य आयोगाची स्थापना करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, कृषि मूल्य आयोगाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कृषि मूल्य आयोगाची स्थापना करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२९-८-२०१५) : (१) व (२) कृषि व पदुम विभागाच्या शासन निर्णय क्र. राकृमुआस्था-२०१४-प्र. क्र. ५९-शेमाभास-११ अे, दिनांक २३ एप्रिल २०१५ अन्वये ' राज्य शेतमाल भाव समितीचे ' रुपांतर ' राज्य कृषि मूल्य आयोगात ' करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेडाच्या अधिकारावर आणलेल्या मर्यादा

(२८) **८५११** (३१-७-२०१५). **श्री. शरद रणपिसे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. संजय दत्त** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताचा विकास, प्रचार व संवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) ही स्वायत्त संस्था स्थापन झाली व पहिल्या काही वर्षातच मेडाने सौर, पवन, चिपाडापासून सहवीज या अपारंपरिक उभारण्यात महाराष्ट्र राज्याला आघाडीवर नेले मात्र गेल्या चार ते पाच वर्षात मेडाचे अधिकारावर मर्यादा आणल्यामुळे मेडाच्या कामकाजावर विपरित परिणाम झालेला आहे, हे खरे आहे काय ;

(२) तसेच अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना भूसंपादन, मूलभूत सुविधा प्रकल्प उभारणीचे नाहरकत प्रमाणपत्र, मंजुरी प्रक्रिया व वीज खरेदी प्रस्ताव मान्यतेअभावी प्रलंबित असल्यामुळे यात कोट्यावधींची गुंतवणूक करणारे उद्योजक महाराष्ट्रातील आपले उद्योग बंद करुन मध्यप्रदेश व आंध्र प्रदेश इत्यादी राज्यात जात असल्याचे दिसून येत आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणाची वस्तुस्थिती काय आहे व याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** (१४-९-२०१५) : (१) नाही. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ही राज्य शासनाची मूलाधार संस्था असून राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा प्रचार, प्रसार व विकास करणे तसेच ऊर्जा बचतीचे कार्यक्रम घेणे तसेच प्रचार व प्रसार करणे हे महाऊर्जाचे उद्दीष्ट आहे. राज्यात गेल्या पाच वर्षात खालीलप्रमाणे अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.——

१. पवनऊर्जा प्रकल्प २३७३.१ मे. वॅ.

२. सौरऊर्जा प्रकल्प ३२९.२५ मे. वॅ.

३. उसाच्या चिपाडापासून सहवीज निर्मिती प्रकल्प ९९२.९५ मे. वॅ.

तसेच महाऊर्जाने गेल्या चार ते पाच वर्षात अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेत भरीव वाढ केल्याने नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी पुरस्कार जाहीर केले आहे. तेव्हा मेडाच्या अधिकारावर मर्यादा आणल्यामुळे कामकाजावर विपरित परिणाम झालेला आहे, हे खरे नाही.

(२) नाही.

(३) राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस चालना देण्याच्या दृष्टीने अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे धोरण जाहीर करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती, शासनाने शासन निर्णय क्र. अपाऊ-२०१५-प्र.प्र ४९-ऊर्जा-७, दिनांक २०-०७-२०१५ अन्वये नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे पारेषण संलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण २०१५ जाहीर केले आहे. या धोरणांतर्गत अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून एकूण १४४०० मे. वॅ. क्षमतेचे प्रकल्प आस्थापित करणेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

---

### राज्यातील विटभट्टी व्यवसायाला वित्तपुरवठा करण्याबाबत

(२९) **८७८४** (३-८-२०१५). **श्री. रामहरी रूपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. जनार्दन चांदूरकर, श्री. संजय दत्त, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. मुझफ्फर हुसैन सय्यद** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील विटभट्टी व्यवसायाला खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने कर्जरुपाने ५० टक्के अनुदान स्वरुपात होणारा वित्तपुरवठा होत नसल्याने सदर व्यवसाय संकटात आला असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, या विटभट्टी व्यवसायाला उभारी देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** (१८-९-२०१५) : (१) हे खरे नाही. राज्यातील विटभट्टी व्यवसायासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने कर्जरुपाने ५० टक्के अनुदान स्वरुपात वित्त पुरवठा करण्याची योजना राबविली जात नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शासनाने भाडेपट्यांनी दिलेल्या जमिनीवरील इमारतीमधील सदनिका विकण्याच्या अटींबाबत

(३०) **९१५३** (३१-७-२०१५). **श्री. किरण पावसकर, श्री. हेमंत टकले, श्री. नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सुनिल तटकरे, श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) शासनाने भाडेपट्यांनी दिलेल्या जमिनीवरील इमारतीमधील सदनिका विकण्यातील अटी शासनाने नुकत्याच शिथिल केलेल्या आहेत, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शासनाने कोणकोणत्या अटी शिथिल केल्या आहेत व त्याची कारणे काय आहेत ;

(३) याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे** (७-९-२०१५) : (१), (२) व (३) शासनाने सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्यांनी दिलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतीमधील सदनिका विकण्या संदर्भातील प्रचलित शासकीय धोरणाबाबत स्पष्टीकरण करणारा शासन निर्णय शासनाने दिनांक १-६-२०१५ रोजी निर्गमित केला आहे. त्यामध्ये निवासी सदनिका हस्तांतरणाबाबत स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

---

**राज्यात सहकार कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन झालेल्या कुक्कुटपालन संस्थांच्या निवडणुका व लेखापरिक्षण करण्याबाबत**

(३१) **९२५२** (३१-७-२०१५). **श्री. विक्रम काळे, श्री. सतीश चव्हाण** : सन्माननीय पशुसंवर्धन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात सहकार कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन झालेल्या कुक्कुटपालन संस्थांच्या निवडणुका व लेखापरिक्षण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय ;

(२) तसेच अवसायनात काढण्यात आलेल्या कर्जाची वसुली होत नसल्याचे माहे एप्रिल २०१५ च्या तिस-या सप्ताहात उघडकीस आले, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय ;

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१८-९-२०१५) : (१) हे अंशतः खरे आहे. एकूण ५४८ चालू कुक्कुटपालन संस्थांपैकी, ३२ संस्थांच्या निवडणुका पार पडल्या असून, ४२ संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय. शासन अनुदानातील कुक्कुटपालन सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करणेकरिता लेखापरिक्षण विभागास कळविण्यात आलेले आहे. वसुलपात्र अवसायनात असलेल्या संस्थांच्या अवसायकास निबंधकाद्वारे प्रथम शासकीय रक्कमांची वसुली करणेसाठी कळविण्यात आलेले आहे. ज्या संस्था शासकीय थकबाकी वसुलीपात्र आहेत व अवसायनात आहेत अशा ठिकाणी जिल्ह्यांचे संबंधित सहाय्यक निबंधक यांचेमार्फत अवसायकाला अवसायानाचे काम करतांना प्रथम प्राधान्याने शासकीय वसुली करणेबाबत वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (अकोला) यांनी सुर्यफुलाचे नवे संकरित वान विकसीत करण्याबाबत केलेला प्रस्ताव**

(३२) **९२९५** (३१-७-२०१५). **श्री. ख्वाजा बेग, श्री. हेमंत टकले** : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने तेल बियाचे उत्पादन वाढविण्याचे दृष्टीने सुर्यफुलाचे नवे संकरित वान विकसीत करण्याचे प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर सुर्यफुलाचे नवीन वान शेतक-यांना केव्हापासून उपलब्ध करुन देण्यात येईल ;

(३) असल्यास, सदर संकरित वानाच्या वापरामुळे शेतक-यांना किती हेक्टरी उत्पादन मिळेल ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१८-९-२०१५) : (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर वाण (पिकेव्हीएसएच-९५२) संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती २०१६ मध्ये विदर्भ विभागाकरिता मंजुरीस सादर करण्यात येईल. समितीची मंजुरी मिळाल्यानंतर खरीप हंगाम २०१७ मध्ये बियाणे उत्पादन करण्यात येईल व खरीप २०१८ च्या खरीप हंगामात शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) अनुकूल हवामानात सदर वाणाची उत्पादन क्षमता प्रति हेक्टरी १५ ते १८ क्विंटलपर्यंत येऊ शकते.

पीकेव्हीएसएच-९५२ या सूर्यफुलाच्या प्रस्तावित वाणाने विदर्भ विभागातील वेगवेगळ्या ठिकाणाच्या चाचणी प्रयोगातून निघालेल्या निष्कर्षानुसार स्थानिक तुल्य वाण पीकेव्हीएसएच-२७ पेक्षा सरासरी १७.७ टक्के व राज्यस्तरीय तुल्य वाण एलएसएफएच-१७१ पेक्षा ५.३ टक्के बियांचे उत्पादन अधिक आढळले.

---

**यवतमाळ जिल्ह्यात सॉईल हेल्थ कार्ड योजना राबविण्याबाबत**

(३३) **९२९८** (३०-७-२०१५). **श्री. ख्वाजा बेग, श्री. हेमंत टकले** : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार यवतमाळ जिल्ह्यात मृदा स्वास्थ्य कार्ड (सॉईल हेल्थ कार्ड), योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, एकमेव माती परिक्षण प्रयोगशाळेला अपुरा निधी व मनुष्यबळाअभावि सदर योजना पुर्ण होईल किंवा कसे याची नागरीकांना खात्री नाही, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, सदर जिल्ह्यात मृदा स्वास्थ्य कार्ड (साईल हेल्थ कार्ड) योजना पुर्ण क्षमतेने राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१५-९-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मृद आरोग्य पत्रिका अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये ३७३२२ नमुने काढण्यात येणार आहेत. माहे जुलै २०१५ अखेर १३३२१ नमुने काढण्यात आलेले आहेत. सदर नमुन्यांची तपासणी करणे व शेतक-यांना आरोग्य पत्रिकेचे वितरण करणे याबाबतची कार्यवाही चालू आहे. जिल्ह्यातील मृद चाचणी प्रयोगशाळेच्या क्षमतेपेक्षा जास्त असलेले मृद नमुने, इतर नोंदणीकृत अशासकीय मृद चाचणी प्रयोगशाळांकडे पाठवून त्याची तपासणी करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व शेतक-यांना तीन वर्षात टप्प्याने सॉईल हेल्थ कार्ड तयार करुन वितरीत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

### राज्यात आदिवासी आश्रम शाळांमध्ये वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन ही योजना राबविण्याबाबत

(३४) **९३००** (२९-७-२०१५). **श्री. ख्वाजा बेग व श्री. हेमंत टकले** : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी शासनाने वॉटर सॅनिटेशन अँड हायजिन अर्थात वॉश ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्याचा निर्णय माहे मे २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णू सवरा** (२३-९-२०१५) : (१) हे खरे आहे. आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन (वॉश) ही योजना शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०१५/प्र.क्र. ५२/का. १३, दिनांक ११ मार्च, २०१५ अन्वये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन (वॉश) या योजनेंतर्गत ५१४ शासकीय आश्रमशाळांचे युनिसेफने, मुख्य संसाधन केंद्राचे ( KRC-Key-Resources Center) मदतीने सर्वेक्षण पूर्ण केले असून सोयी सुविधांच्या आधारे आश्रमशाळांचे शून्य, एक, दोन व तीन तारांकित याप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार प्रत्येक आश्रमशाळा-निहाय वॉश सुविधा पुर्ततेचा आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये दुष्काळग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

(३५) **९४१९** (३१-७-२०१५). **श्री. जयवंतराव जाधव, श्री. ख्वाजा बेग, श्री. हेमंत टकले, श्री. अनिल भोसले, श्री. धनंजय मुंडे, श्री. सुनिल तटकरे, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. अमरसिंह पंडीत, श्री. सतिश चव्हाण** : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यामध्ये खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमध्ये पीक नुकसान भरपाई पोटी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे रु. ४८०३.०९ कोटीची मागणी केली होती, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, ४८०३.०९ कोटी रुपयांची मागणी असतांना राज्य शासनाने प्रत्यक्षात रु. ४००० कोटी शेतक-यांना वितरीत करण्यासाठी उपलब्ध करून दिले, हे खरे आहे काय ;

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांचे बँकेत खाते नसल्याने उपलब्ध केलेल्या रकमेपैकी रु. ४६०.२६ कोटी रुपये ३१ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनास समर्पित करण्यात आले, हे खरे आहे काय ;

(४) असल्यास, त्यामुळे एकूण मागणी रु. ४८०३.०९ कोटी पैकी प्रत्यक्षात शेतक-यांच्या खात्यामध्ये रु. ३४३५.७३ कोटी एवढेच जमा झाले आहे, हे खरे आहे काय;

(५) उर्वरित रु. १३६७.३६ कोटी शेतक-यांना मिळाले नसल्याने त्यांना नुकसान भरपाईपासून वंचित रहावे लागले आहे, हे खरे आहे काय ;

(६) असल्यास, उर्वरित १३६७.३६ कोटी रुपये उपलब्ध करून देणेबाबत शासनाची भूमिका काय ;

(७) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (२९-९-२०१५) : (१), (२), (३) व (४) होय.

(५), (६) व (७) सर्व विभागीय आयुक्त यांच्या अंतिम मागणीच्या आधारे रु. ४०२.७३ कोटी इतका निधी दिनांक ८-७-२०१५ रोजी वितरीत करण्यात आला. हा निधी बाधित शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्राणीक्रुरता समिती स्थापन करण्याबाबत**

(३६) **९४५८** (३०-७-२०१५). **श्री. नरेंद्र पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. हेमंत टकले, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. किरण पावसकर, श्री. संदिप बाजोरिया, ॲड. निरंजन डावखरे, श्री. ख्वाजा बेग** : सन्माननीय पशुसंवर्धन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) मोकाट जनावरे व पशु-पक्ष्यांच्या संवर्धनासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्राणीक्रुरता समिती स्थापन करण्याबाबत केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने आदेश काढून १५ वर्षांचा कालावधी उलटूनही राज्यात सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ;

(३) तसेच, सदर आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२९-०८-२०१५) : (१) हे खरे नाही. प्राणी क्लेष प्रतिबंधक कायदा, १९६० व त्याखालील नियम जिल्हा पातळीवर यथायोग्यपणे राबविण्याची आवश्यकता लक्षात घेवून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सन २००० मध्ये प्राणी क्लेष प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच या समितीची सन २०१३ मध्ये पुनर्रचना करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

**शेतीमालाला किफायतशीर भाव मिळण्याबाबत**

(३७) **९७१५** (३०-७-२०१५). **श्रीमती स्मिता वाघ** : सन्माननीय कृषि मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावेत व ग्राहकांना वाजवी दरात शेतीमाल खरेदी करता यावा यासाठी शेतीमाल भाव समितीचे पुनर्गठन करून केंद्र सरकारच्या धर्तीवर कृषि मूल्य आयोग गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे ;

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१८-९-२०१५) : (१) व (२) शासन निर्णय क्र. राकृमुआस्था-२०१४/प्र.क्र. ५९/ शेभाभास-११अे, दिनांक २३ एप्रिल २०१५ अन्वये 'राज्य शेतमाल भाव समितीचे' रुपांतर 'राज्य कृषि मूल्य आयोगात' करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पशुसंवर्धन विभागात गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत**

(३८) **९७७९** (३०-७-२०१५). **श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय पशुसंवर्धन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यातील पशुसंवर्धन विभागात गट-अ संवर्गाची ३७२ पदे रिक्त असून दिनांक १२ मार्च, २०१५ ला पात्र ३०० उमेदवारांची यादी जाहिर केली, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर पात्र उमेदवाराची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२८-९-२०१५) : (१) होय. हे खरे आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी गट-अ या पदाकरिता ३०० उमेदवारांची शिफारस शासनाकडे केली असून त्यापैकी साक्षांकन नमुना प्राप्त २९६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे. उर्वरित ४ उमेदवारांनी नियुक्ती नाकारल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे ४ उमेदवारांची मागणी केलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**मराठी भाषा फाऊडेंशन कोर्स नगरपरिषद व जिल्हापरिषद उर्दू माध्यमांच्या शाळांना लागू करण्याबाबत**

(३९) **९८०९** (३०-७-२०१५). **श्री. श्रीकांत देशपांडे** : सन्माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग यांच्यामार्फत राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अल्पसंख्यांक कक्षाकडून मुस्लीम विद्यार्थ्यांकरिता राबविली जाणारी योजना मराठी फाऊंडेशन कोर्स नगरपरिषद व जिल्हापरिषदेच्या उर्दू माध्यमांच्या शाळांना लागू करण्याविषयी प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीने निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, अनेक वर्षापासूनची असलेल्या मागणीकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, मराठी फाऊंडेशन कोर्स नगर परिषद व जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमांच्या शाळांना लागू करण्याविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (२-९-२०१५) : (१) होय.

(२) व (३) शासन ज्ञापन सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११-०९-२००६ अन्वये इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी उर्दू/इंग्रजी माध्यमांच्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण वर्ग ही योजना सुरु करण्यास मान्यता प्रदान केली होती. शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग, दिनांक २७-०४-२०१५ अन्वये राज्यातील इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्यांक समुहातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे ज्ञान अवगत होण्यासाठी मराठी भाषा फाऊंडेशन वर्ग ही योजना सुधारित स्वरूपात सर्व उर्दू शाळांसह इतर अमराठी शाळांमध्ये लागू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात मालेगाव, दिंडोरी येथे औद्योगिक क्लस्टरची उभारणी करण्याबाबत**

(४०) **९८७१** (२९-७-२०१५). **डॉ. अपूर्व हिरे** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.-

(१) नाशिक जिल्ह्यात मालेगाव तसेच दिंडोरी येथे औद्योगिक क्लस्टरची उभारणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, मालेगाव व अन्यत्र औद्योगिक क्लस्टर उभारण्याच्या अनुषंगाने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्यास, ती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ;

(४) असल्यास, मालेगाव येथे प्रस्तूत औद्योगिक क्लस्टर केव्हापर्यंत स्थापित होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुभाष देसाई** (१-९-२०१५) : (१) अंशतः खरे आहे. नाशिक जिल्ह्यात सुक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास कार्यक्रमांतर्गत मालेगाव येथे टेक्सटाईल क्लस्टर या औद्योगिक समुहास सामायिक सुविधा केंद्रासाठी, केंद्र शासनाने दिनांक २८-८-२०१२ रोजी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मालेगाव येथील औद्योगिक क्लस्टरचे सामायिक सुविधा केंद्र दिनांक २७-०८-२०१४ रोजी अंशतः कार्यरत झालेले आहे.

तसेच दिंडोरी येथे राज्य शासनाचे एमएसआयसीडीपी योजनेअंतर्गत क्लस्टर स्थापन करणेबाबत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांच्या कार्यालयाकडून प्रयत्न केले जात आहेत.

(२) व (३) केंद्र शासनाच्या IIUS योजने अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील इंजिनिअरिंग क्लस्टर, नाशिक कार्यान्वित झाले आहे.

केंद्र शासनाच्या MSE-CDP या योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे टेक्सटाईल क्लस्टरची उभारणी झाली असून दिनांक २८-०८-२०१२ रोजी संबंधित क्लस्टरला केंद्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. संबंधित क्लस्टरचे सामायिक सुविधा केंद्र दिनांक २७-०८-२०१४ रोजी अंशतः कार्यान्वित झाले आहे. तसेच पैठणी क्लस्टर, येवला, नाशिक या औद्योगिक समूहास अलीकडेच तत्वतः मंजूरी मिळालेली आहे. बेदाणा क्लस्टर, पिंपळगाव यांचा निदानोपयोगी अभ्यास अहवाल केंद्र शासनाकडून मंजूर होवून क्षमतावृध्दी कार्यक्रम राबविण्याकरिता अनुदानही प्राप्त झाले आहे. या योजने अंतर्गत वाईन क्लस्टर, विंचूर व महिला फूड क्लस्टर, नाशिक हे इतर २ प्रकल्प सुध्दा प्रस्तावित आहेत.

राज्य शासनाची MSICDP या योजनेंतर्गत नाशिक जिल्ह्यातील तनिष्क जरदोशी क्लस्टर, येवला व ॲग्रीकल्चर इक्वीपमेंटस्, अंदरसूल या औद्योगिक समूहांना राज्य शासनाची मान्यता मिळालेली असून त्यांना औद्योगिक समूह प्रकल्पाच्या क्षमतावृध्दी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचे अनुक्रमे रु. ७.३१ लक्ष व रु. ६.७२ लक्ष इतके अनुदान राज्य शासनाकडून वितरीत करण्यात आलेले आहे.

(४) केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजनेच्या अनुषंगाने टेक्सटाईल क्लस्टर, मालेगाव येथे सामायिक सुविधा केंद्र दिनांक २७-०८-२०१४ रोजी अंशतः कार्यरत झालेले आहे.

---

### फळपीक विमा योजनेतील अव्यवहार्य अटी व शर्तीमुळे नुकसानग्रस्त शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत

(४१) **९९२६** (३०-७-२०१५). **मा. डॉ. अपूर्व हिरे** : तारांकित प्रश्न क्र. ५२६८ ला दि. ३१-३-२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात गारपीट व बेमोसमी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकरी व फळ उत्पादकांना प्रचलित फळपीक विमा योजनेतील अव्यवहार्य अटी व शर्तीमुळे विम्याचा लाभापासून वंचीत रहावे लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर फळपीक विमा योजनेत सुधारणा करण्याच्या धोरणांतर्गत शासनास केंद्र शासनाकडून नवीन मार्गदर्शक सूचना मिळणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून प्रस्तुत मार्गदर्शक सूचना शासनास प्राप्त झाल्या आहेत काय ;

(३) असल्यास, फळपीक विमा योजनेचा लाभ प्रत्येक नुकसानग्रस्त शेतक-यास मिळावा, या अनुषंगाने विद्यमान विमा योजनेत कोणता सुधार करण्यात आला आहे ;

(४) अद्याप मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्या नसल्यास, याबाबत शासनाकडून कोणता पाठपुरावा करण्यात आला वा करण्यात येत आहे व सदरील मार्गदर्शक सूचना केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१५-९-२०१५) : (१) हे खरे नाही. तथापि, सदर योजनेसाठीच्या राज्यस्तरीय हवामान धोके अंतिम करणा-या समितीकडून हवामान धोके सुधारणाबाबत आलेल्या सूचनांचा वेळोवेळी अंतर्भाव करण्यात येऊन त्यास राज्य शासनाची मान्यता घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो. राज्यस्तरीय समितीकडून सूचविण्यात आलेल्या सुधारणा वेळोवेळी त्या त्या शासन निर्णयान्वये अंतर्भूत करण्यात येतात. सदर राज्यस्तरीय समितीमध्ये विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, विविध फलोत्पादन संघाचे प्रतिनिधी, विमा प्रतिनिधी तसेच संबंधित शासकीय अधिकारी इ. चा समावेश असतो.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सरकारी जमिनीवर मागासवर्गीय सदस्यांच्या सदनिका इतर प्रवर्गातील सदस्यांना विकण्याची अनुमती देण्याबाबत**

(४२) **९९५६** (३१-७-२०१५). **प्रा. जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) महसूल विभागाच्या अखत्यारित असणा-या सरकारी जमिनीवर निवासी सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील मागासवर्गीय सदस्यांना त्यांच्या सदनिका आता इतर प्रवर्गातील सदस्यांना विकण्याची अनुमती देण्यात येणार असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्या अनुषंगाने याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (४-९-२०१५) : (१) व (२) महसूल विभागाच्या अखत्यारीतील शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील मागासवर्गीय सदस्यांना त्यांची सदनिका अमागास प्रवर्गातील व्यक्तीस विकण्यास मुभा देण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक १-६-२०१५ अन्वये आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील देवस्थानाच्या जमिनीवरील वहीवाट असलेल्या शेतक-यांच्या प्रश्नाबाबत**

(४३) **१०११६** (३०-७-२०१५). **श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) पालव समितीच्या अहवालानुसार रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सुमारे १ लाख बेदखल कूळ व घरठाण असलेल्या शेतक-यांच्या प्रश्नांची प्रातिनिधीक चौकशी करण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडून दिनांक ९ व १० जून २०१५ रोजी पाहणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, देवस्थानाच्या जमिनीवरील वहिवाट असलेल्या शेतक-यांची पाहणी समितीने केली आहे काय ;

(३) असल्यास, त्यामध्ये काय आढळून आले आहे ;

(४) असल्यास, यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे** (४-९-२०१५) : (१), (२), (३) व (४) कोकणातील, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांच्या समस्या जाणून घेण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या समितीने दिनांक ८-६-२०१५ रोजी सिंधुदूर्ग व दिनांक ९-६-२०१५ व १०-६-२०१५ रोजी रत्नागिरी येथे काही गावांना भेटी दिलेल्या आहेत. प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून बेदखल कुळांच्या समस्या जाणून घेवून, बेदखल कुळांच्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता सदर समितीचा अहवाल शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्याबाबत**

(४४) **१०७७६** (२-८-२०१५). **श्री. हेमंत टकले, श्री. किरण पावसकर, श्री. नरेंद्र पाटील** : सन्माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) राज्यात संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ;

(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले** (२३-९-२०१५) : (१) होय. हे खरे आहे. अशा स्वरुपाचा निर्णय दिनांक ५ मे, २०१५ रोजी घेण्यात आलेला आहे.

(२) ज्या तालुक्यांमध्ये नियमित संजय गांधी योजना समिती गठीत झाली नसेल अशा तालुक्यात अर्जदाराचे अर्ज मंजूर करण्याचे अधिकार संबंधीत उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना प्रदान केले होते. परंतु, त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे समितीच्या बैठका वेळेवर आयोजित करणे त्यांना शक्य होत नव्हते परिणामी अर्जदारांचे अर्ज प्रलंबीत राहत होते. सदर बाब विचारात घेऊन विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत ज्या तालुक्यामध्ये नियमित संजय गांधी योजना समिती गठीत झाली नसेल त्या तालुक्यातील अर्जदारांचे अर्ज निकाली काढण्याचे अधिकार संबंधीत तहसीलदार यांना प्रदान केले आहेत.

(३) याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून म्हणजे दिनांक ५ मे, २०१५ पासून सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

---

**नागपूर शहरातील रुग्णालये व नर्सींग होमची नोंदणी महापालिकेत नसल्याबाबत**

(४५) **११०६६** (१४-१-२०११). **श्री. संजय दत्त** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नागपूर शहरातील सर्व रुग्णालये, नर्सींग होम, पॅथॅलॉजी लॅबची नोंदणी आणि त्यांचे नुतनीकरण महापालिकेत करण्याचे बंधनकारक असताना नागपूर शहरातील ६४१ इस्पीतळे आणि नर्सींग होम असून त्यातील २३ रुग्णालयांची महापालिकेत नोंदणी नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१० मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, महापालिकेने नोंदणी न करणा-या २३ रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (२९-७-२०१५) : (१) माहे ऑगस्ट २०१० च्या सुमारास २३ रुग्णालयांची नोंदणी नसल्याची बाब खरी नाही.

सदर २३ नोंदणीकृत रुग्णालयांची नुतनीकरण कार्यवाही अर्जदाराने विहित मुदतीत अर्ज सादर न केल्याने प्रलंबित होती.

(२) नमूद २३ रुग्णालय धारकांचेविरुध्द नोटीस कार्यवाही करण्यात आली होती त्यापैकी १० रुग्णालये प्रत्यक्षात कायम बंद असल्याचे आढळून आले उर्वरित १३ रुग्णालयांच्या नोंदणीचे नुतनीकरण दंडात्मक कार्यवाही करुन नियमित करण्यात आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चांदूर रेल्वे (जि. अमरावती) येथील गुरांचा दवाखान्याच्या जागेचा मालकी हक्क हस्तांतरणाबाबत

(४६) **२६२८५** (२७-४-२०१२). **श्री. अशोक उर्फ भाई जगताप** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) चांदूर रेल्वे (जि. अमरावती) येथील गुरांचा दवाखाना या जागेचा मालकी हक्क हस्तांतरणाबाबत लोकप्रतिनिधी यांनी उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे, अमरावती यांना दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ;

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (३१-०७-२०१५) : (१) होय.

(२) व (३) चांदूर रेल्वे येथील जुन्या गावठाणाच्या नकाशात गुरांचा दवाखाना असल्याबाबत नोंद आहे. दवाखान्याची जागा गावठाणामध्ये असल्यामुळे गाव नमुना नं. ७/१२ किंवा तलाठी रेकॉर्डमध्ये नोंद नाही. नगर परिषद, चांदुर रेल्वे यांच्या दप्तरी ठेवण्यात आलेल्या मालमत्ता रजिस्टरला क्र. १/२, २(१), २(२) मध्ये गुरांचा दवाखाना, निवासस्थान आणि स्टोअर्स रुम या मालमत्तेची नोंद आहे. प्रस्तुत प्रकरणी पशुचिकित्सालय अस्तित्वात असून कार्यरत आहे.

---

### नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासामधील विकास कामांबाबत

(४७) **३८५४१** (१६-५-२०१३). **श्री. संजय दत्त** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नागपूर सुधार प्रन्यासच्या विविध योजनाअंतर्गत भूसंपादीत भूसंपादनाधीन असलेल्या जागेवरील अनधिकृत अभिन्यासातील भूखंडाचे नियमीतीकरणाचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, नागपूर शहरातील अनधिकृत अभिन्यासातील भूखंडाचे नियमितीकरणाचा प्रश्न गत १२ वर्षाचे कालावधीत नासुप्र ने गुंठेवारी २००१ अंतर्गत व शासन निर्णय १७ जुलै, २००७ व ८ सप्टेंबर, २०१० नुसार शहरातील ७० ते ८० टक्के भूखंडांचे नियमितीकरण केलेले आहे. परंतु मागील ३० ते ४० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे काही भूखंडाचे नियमितीकरण केलेले आहे. परंतु मागील ३० ते ४० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे काही भूखंड नियमितीकरण होणे बाकी असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय ;

(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** (३०-७-२०१५) : (१), (२) व (३) नागपूर सुधार प्रन्यासने या संदर्भात दिनांक १९-९-२०११ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुलक्षून दिनांक २४-३-२०१५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहे व पुढील कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासकडून अपेक्षित आहे.

---

**केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त भागासाठी देण्यात आलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीत झालेला गैरव्यवहार**

(४८) **४३६११** (१६-८-२०१३). **श्री. अमरनाथ राजूरकर, श्री. संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी** : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) केंद्र सरकारकडून दुष्काळग्रस्त भागासाठी देण्यात आलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीत गैरव्यवहार झाला असल्याचा आरोप शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शेतक-यांना दिल्या जाणा-या कर्जमाफीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हेही खरे आहे काय ;

(३) असल्यास, निवृत्त न्यायाधिशांमार्फत चौकशी करावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय ;

(४) असल्यास, दोषींवर कोणत्या स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे वा येणार आहे

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील)** (३०-०७-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२) कोल्हापूर विभागामध्ये, नाबार्ड तपासणीमध्ये अपात्र रकमा आढळून आलेल्या आहेत. तसेच नाशिक विभागातील पारनेर तालुक्यातील निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., निघोज, तालुका पारनेर या संस्थेच्या दोन सभासदांनी चुकीची कर्जमाफी घेतलेली आहे. संबंधित दोन्ही सभासदांकडून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर यांनी एकूण रक्कम रु. १६,६७९ वसूल केली आहे.

(३) अशी तक्रार प्राप्त झालेली नाही. अशा आशयाची मागणी ह्या कार्यालयामध्ये प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूर कॉलनी येथे असलेल्या तलाठी कार्यालय विद्याविहार येथे स्थलांतरित करण्याबाबत**

(४९) **४९६०६** (८-७-२०१४). **श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. अनिल भोसले, श्री. नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. दिपकराव साळुंखे-पाटील, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. हेमंत टकले** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) मुंबईतील चेंबूर कॉलनी येथे असलेल्या तलाठी कार्यालय विद्याविहार येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ;

(३) असल्यास, स्थलांतरीत करण्यात आलेले कार्यालय पुन्हा चेंबूर येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ;

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ खडसे** (६-८-२०१५) : (१) व (२) होय, चेंबूर, सिंधीकॅम्प येथील तलाठी कार्यालय जुन्या बैठ्या इमारतीत कार्यरत होते. तेथे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होते व पाणी साचते त्यामुळे महत्वाचे अभिलेख भिजून खराब होण्याची शक्यता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात सदर कार्यालय विद्याविहार येथील शासकीय जागेत हलविण्यात आले होते.

(३) व (४) चेंबूर, सिंधीकॅम्प येथील तलाठी कार्यालयाच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करून तलाठी कार्यालय सद्यःस्थितीत चेंबूर येथे मूळच्या जागेत कार्यरत आहे.

---

## नांदगाव (ता. पालघर, जि. ठाणे) च्या किना-यावर जिंदाल समूह प्रकल्पाच्या परीसरातील जमिनी छुप्या पध्दतीने खरेदी करीत असल्याबाबत

(५०) **५१४२९** (१-७-२०१४). **श्री. आनंद ठाकूर** : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.——

(१) नांदगाव (ता. पालघर, जि. ठाणे) च्या किना-यावर जिंदाल समूह प्रकल्पाच्या परीसरातील जमिनी छुप्या पध्दतीने खरेदी करीत असल्याचे स्थानिक रहिवाश्यांच्या निदर्शनास आल्यानंतर मुरबे, नांदगाव, आलेवाडी ग्रामपंचायतीनी खरेदी विक्रीला तीव्र विरोध केला आहे, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, शासनाने याबाबत सविस्तर चौकशी केली आहे काय ;

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने संबंधीत कंपनी मालकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ;

(४) अद्यापी कोणतीच कारवाई केली नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** (१७-८-२०१५) : (१) ग्रामपंचायत नांदगाव तर्फे तारापुर ग्रामपंचायत आलेवाडी-गुंदवली, ग्रामपंचायत नवापुर, ग्रामपंचायत मुरबे यांनी दिनांक ९-१-२०१४, रोजी मंडळ अधिकारी, तारापुर यांचेकडे व दिनांक ८-३-२०१४ रोजी तहसीलदार, पालघर यांचेकडे यासंदर्भात हरकत दाखल केली आहे.

(२) व (३) मे. जे. एस. डब्लू नांदगाव पोर्ट लि. यांनी दिनांक २६-११-२०१३ रोजी मौजे गुंदवली येथील स. नं. १२६ क्षेत्र १२-१०-४ हे. आर पो. ख. ०-०८-० पै. २-५७-४ हे. आर पो. ख. ०-०८-० तसेच ग.नं. १३० क्षेत्र ४-३४-० हे. आर पो. ख. ०-०५-० तसेच दिनांक १८-२-२०१२ रोजी मौजे आलेवाडी येथील स. नं. ७७ अ क्षेत्र १-२३-९ हे. आर ही जमीन नोंदणीकृत खरेदीखतान्वये खरेदी केलेली असून आज रोजी गा. न. नं. ७/१२ सदरील मे. जे. एस. डब्लू कंपनीचे नावे दाखल आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**उत्तमसिंग चव्हाण,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

विधान भवन :
नागपूर.

शामुना—एचबी-२१०८—मविसना—११-२०१५—४६० प्रती—पीआर ८*.